दै. गोदातीर दि 17-06-2022

# ऑपरेशन मुस्कान-११ या शोध मोहिमेदरम्यान दोन अल्पवयीन मुले सापडली



**नांदेड**- विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग यांनी हरवलेल्या बालकांच्या संदर्भात दिलेल्या निर्देशानुसार ऑपरेशन मुस्कान-११ महाराष्ट्र ही शोध मोहीम दिनांक एक ते ३० जून या कालावधीत राबविण्याच्या सुचना मिळाल्या होत्या. यावरुन पोलीस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक निलेश मोरे, पोलीस उपअधिक्षक डॉ. विजय कबाडे, पोलीस उपअधिक्षक डॉ. अश्विनी जगताप, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १५ जून रोजी अनैतिक मानवी वाहतूक कक्षाच्या फौजदार प्रियंका आघाव सोबत हवालदार अच्युत मोरे, मारोती माने, कुलकर्णी व लोहमार्ग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेश उनवणे व उत्तम कांबळे, दिगंबर राठोड असे रेल्वे स्टेशन परिसरात शोध मोहीम राबवित होते.

यावेळी रेल्वे स्थानकावर एक अल्पवयीन मुलगा संशयास्पदरित्या बसलेला मिळून आला. त्यास ताब्यात घेवून विचारपूस केली असता त्याने आपले नाव ऋषीवर्धन साईनाथ कुन्हे (वय १७) रा. रुदूर ता. बोधन जि. निजामाबाद असे सांगितले. मी नांदेड येथे कसा आलो याबाबत मला काहीएक सांगता येत नाही असे त्याने सांगितले. त्यास विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्याने त्याच्या वडिलाचा मोबाईल नंबर सांगितल्याने आम्ही त्याचे वडील साईनाथ कुन्हे यांना फोन करून विचारपूस केली असता माझा मुलगा ऋषीवर्धन हा हरवला असून आम्ही त्याचा निजामाबाद येथे शोध घेत आहोत. त्यांना नांदेड येथे बोलावून घेवुन शहानिशा करुन सदर मुलास त्याचे वडील साईनाथ लक्ष्मण कुन्हे यांचे ताब्यात दिले.

तसेच रेल्वे स्टेशन फ्लाट नंबर एकवर एक १० वर्षीय अल्पवयीन मुलगा मो. हबीब मो. अजीज बागवान रा. यासर कॉलनी, देगलूर नाका नांदेड हा एकटा फिरत असतांना मिळून आला. त्यास विचारपूस करता तो वडील दारू पिउन रागावत असल्याने त्यांना भिवून मी रेल्वे स्टेशन येथे आलो असल्याचे सांगितल्याने त्यास ताब्यात घेवून त्याची आई शाहीन हबीब मोहम्मद बागवान यांच्या ओळखपत्रावरुन सदर मुलाची आई असलेबाबत शहानिशा करुन तिचे ताब्यात दिले आहे. तरी जनतेस कळविण्यात येते की, बेवारस किंवा संशयास्पदरित्या मुलं, मुली फिरत असताना मिळून आल्यास पोलीस विभागास कळवून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.


क केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी,
मधुकरराव घोणसे पाटील.
ई ९९६७०६२३५४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com


गोदातीर दि 17/06/2022